जा.क्र. 2191 /२०२४
जिल्हा न्यायालय, पंढरपूर
दिनांक :— ०८/०२/२०२४

# —: जाहीर नोटीस :—

जिल्हा न्यायालय, पंढरपूर न्यायालयातील, नियमानुसार नाश करण्यात आलेल्या अभिलेखाची (रेकॉर्ड) 'नवीन रद्दी' व 'जुनी रद्दी' विक्री करणेसाठी या जाहीर नोटीसव्दारे रद्दी खरेदीदाराकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

## —: नियम व अटी :—

१. सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दिनांक २१.०२.२०२४ पर्यंत जिल्हा न्यायालय, पंढरपूर येथे ''अधिक्षक कार्यालयात'' मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर यांच्या नावाने बंद लखोट्यात दरपत्रक सादर करावे. लखोट्यावर ''रद्दी खरेदीबाबत दरपत्रक'' असे नमुद करण्यात यावे.
२. मुदती नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
३. रद्दीचा दर प्रति किलो 'नवीन रद्दी' व 'जुनी रद्दी' याप्रमाणे पुर्णांकात नमूद करावा. इतर प्रकारे दर नमूद केल्यास दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही व त्यास निविदाकार जबाबदार राहतील. तसेच त्याबाबत नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.
४. रद्दी या कार्यालयाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनेनुसार प्रत्यक्ष जागेवर जाऊन, आहे त्या स्थितीमध्ये इलेक्ट्रॉनिक वजन काट्याव्दारे वजन करुन, संबंधीत कार्यालयात त्याची होणारी रक्कम रोख स्वरुपात जमा केल्यानंतरच रद्दी ताब्यात घ्यावयाची आहे.
५. त्यासाठी बारदाना, रद्दी खरेदीदाराने आणावयाचा आहे, तसेच वाहतुक खर्चही त्यांनीच करावयाचा आहे.
६. दरपत्रके ही कार्यालयीन वेळी सकाळी १०.३० ते सायं ५.००, सुट्टीचे दिवस सोडून ''बंद लखोट्यात'' आणून द्यावीत.
७. रद्दीचे कोणतेही दरपत्रक मंजुर करण्याचा अगर कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार ''मा. जिल्हा न्यायाधीश, पंढरपूर'' यांनी स्वत: कडे राखून ठेवला आहे.

आदेशावरुन,

8.2.24
अधिक्षक
**जिल्हा न्यायालय, पंढरपूर**

क.लि. सहा. अधिक्षक

प्रत.
१. जिल्हा न्यायालय, सोलापूर अधिकृत संकेतस्थळ.
२. जिल्हा न्यायालय, पंढरपूर नोटीस बोर्ड.